# 'दीपक नायट्रेट'चा एनसीएलशी संशोधन करार

**पुणे, ता. १२ :** राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा (एनसीएल) आणि दीपक नायट्रेट लिमिटेड (डीएनएल) यांच्यात संशोधन कार्याबाबत करार झाला आहे. या कराराचा एक भाग म्हणून दीपक नायट्रेटने 'एनसीएल'च्या जवळ असलेल्या 'एनसीएल इनोव्हेशन पार्क'मध्ये 'दीपक रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाउंडेशन' (डीआरडीएफ) या नावाने संशोधन केंद्र सुरू केले आहे. वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेचे (सीएसआयआर) महासंचालक डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या हस्ते त्याचे नुकतेच उद्‌घाटन झाले. 'एनसीएल' संशोधन परिषदेचे अध्यक्ष डॉ. एम. एम. शर्मा, 'एनसीएल'चे संचालक डॉ. एस. शिवराम, माजी संचालक डॉ. एल. के. दोरायस्वामी, डॉ. पॉल रत्नास्वामी, 'दीपक नायट्रेट'चे व्यवस्थापकीय संचालक दीपक मेहता आदी या वेळी उपस्थित होते.

सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रांतील संस्थांनी परस्पर साधनसुविधा आणि मनुष्यबळाचा वापर करून संयुक्तपणे संशोधन करण्याचे नवे प्रारूप या कराराद्वारे पुढे आल्याचे सांगण्यात आले. 'एनसीएल इनोव्हेशन पार्क' अलीकडेच सुरू करण्यात आले आहे. या पार्कच्या सुमारे ४३०० चौरस मीटर क्षेत्रात नवीन संशोधन संस्था, नावीन्यपूर्ण संशोधनाचे उद्योगासाठी उपयोग करण्याचे केंद्र (बिझनेस इनक्युबेटर), ज्ञानाधिष्ठित उपक्रम यांना स्थान दिले जाणार आहे.